# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील सिंचन योजना निधी अभावी अपूर्ण असल्याबाबत

**(१) २०८३९ (१९-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी शासनाला सुमारे सत्तर हजार कोटी रुपयांची गरज असून प्रतिवर्षी हा खर्च दहा टक्यानी वाढत आहे असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी अनेक योजना व प्रकल्प अडचणीत असून ते पूर्ण करण्यासाठी एकरकमी निधीची गरज आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर सिंचन योजना पूर्ण करण्याच्या दृष्टिने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करणार आहेत,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-११-२०१६) :**(१) राज्यातील बांधकामाधीन ४०३ प्रकल्पांच्या कामाची उर्वरित किंमत सुमारे ७४,००० कोटी इतकी आहे. राज्य शासन अर्थोपायाच्या स्थितीनुसार दरवर्षी सुमारे ५ ते ६ हजार कोटी रुपयांचा निधी प्रकल्पांसाठी उपलब्ध करीत आहे. नैसर्गिक भाववाढीनुसार प्रकल्पांच्या उर्वरित किंमतीत वाढ होत आहे.

(२) व (३) अपुर्ण पाटबंधारे प्रकल्पांचे दायित्व मोठे असून अपूर्ण प्रकल्पांबाबत पुढीलप्रमाणे उपाय योजना शासनाने प्रसिध्द केलेल्या श्वेतपत्रिकेत नमुद करण्यात आली आहे.

प्रकल्प पुर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याबाबतचा आढावा घेऊन त्यानुसर प्रकल्पाचा अग्रक्रम ठरविण्यात येईल व या प्राधान्यक्रमानुसार आर्थिक गुंतवणुक केली जाईल. ज्या प्रकल्पापासून पुढील ३ वर्षात प्रत्यक्ष सिंचन लाभ शेतकऱ्यांस मिळू शकेल, अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येईल. मात्र अमरावती प्रदेशातील अनुशेष जिल्ह्यातील प्रकल्पांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खान्देशातील तापी नदीवरील प्रकल्पात पाणी अडविण्याबाबत**

**(२) ३०६५५ (१४-०१-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खान्देशातील तापी नदीवरील प्रकल्पात पाणी अडविले जात नसल्याने व पाटबंधारे विभाग दुर्लक्ष करीत असल्याने शेतकरी व प्रशासन यांच्यात संघर्ष निर्माण होण्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तापी प्रकल्पात पाणी अडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) तापी नदीवर सद्य:स्थितीत सुलवाडे बॅरेज, सारंगखेडा बॅरेज व प्रकाशा बॅरेज ही ३ बॅरेजेस पुर्ण झाली असून त्यांमध्ये अनुक्रमे ६५.०६, ९२.१० व ६३.६४ दलघमी पाणीसाठी सन २००९ पासून निर्माण झाला आहे. तसेच, शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्प व निम्न तापी मोठा प्रकल्प या दोन प्रकल्पांची बांधकामे प्रगतीपथावर असल्याने त्यामध्ये पाणीसाठा होऊ शकत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात रेशीम उद्योग विकास योजना राबविण्याबाबत**

**(३) ३३२१४ (२२-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बीड, जालना व औरंगाबाद येथे प्रायोगिक तत्वावर यशस्वीपणे राबविण्यात आल्यानंतर आता रेशीम उद्योग विकास योजना राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाच्या नियोजन विभागाने घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे काय आहे,

(२) असल्यास, या निर्णयची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-११-२०१६) :**(१) होय.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामणी रोजगार हमी योजने अंतर्गत रेशीम उद्योग विकास योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय दि.३ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. तसेच तुती लागवड, कोष उत्पादन, चॉकी किटक वाटप व किटक संगोपन गृह बांधकाम इत्यादी बाबींच्या समावेश मनरेगामध्ये करण्यात आला आहे.

(२) रेशीम संचालनालयामार्फत विभागीय स्तरावर कार्यशळा आयोजित करुन मनरेगा कार्यप्रणालीची माहिती देण्यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सन २०१६-१७ साठी ६०२५ एकर क्षेत्रावर तुती लागवडीचा लक्षांक देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत राबविण्यात आलेल्या वृक्ष लागवड योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४) ३३७३१ (२२-०१-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर वृक्ष लागवड केली जाते, यावरती रोजगार हमी योजनेअंतर्गत करोडो रुपयांचा खर्च करुन देखील प्रत्यक्ष लागवड केलेल्या झाडापैकी केवळ १० ते १५ टक्के झाडे जगतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत अंजनगाव सुर्जी व दर्यापूर तालुक्यामध्ये प्रत्यक्ष झाडाची लागवड योग्य पध्दतीने संगोपन न केल्यामुळे झाडे जगण्याची संख्या फारच कमी आहे, या याजनेमध्ये ग्रामस्तरावर अधिकाऱ्यांकडून गैरव्यवहार होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१०-११-२०१६) :**(१) नाही.

अमरावती जिल्हयातील सामाजिक वनीकरण विभागाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर प्रत्यक्ष लागवड केलेल्या झाडांपैकी ८५ ते ९०% झाडे जगत आहेत.

(२) नाही.

अमरावती जिल्हयातील अंजनगाव सुर्जी व दर्यापूर तालुक्यामध्ये लागवड केलेल्या झाडांचे योग्य पध्दतीने संगोपन केले जात असून अंजनगाव सुर्जी व दर्यापूर तालुक्यात मागली ३ वर्षात झालेल्या वृक्ष लागवड कामाची जिवंत रोपांची टक्केवारी ८५% पेक्षा जास्त आहे. तसेच ग्रामस्तरावर अधिकाऱ्यांकडून गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अंबुजा सिमेंट कंपनी ला पकडीगुड्डम-मरकागोदी धरणाचे पाणी देण्याच्या कराराबाबत**

**(५) ३६६५९ (१५-०१-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अंबुजा सिमेंट कंपनी, उपरवाही ला पकडीगुड्डम - मरकागोदी धरणाचे पाणी देण्याचे शासनाकडून करार करण्यात आलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पकडीगुड्ड - मरकागोदी तलावाखाली लाभार्थी क्षेत्र २८६०.०० सिंचनाखाली येत असल्याने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शेतक-यांना पाणी न देण्याची अंमलबजावणी संबंधीत कार्यालयाकडून करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाणी करारामुळे लगतच्या शेतकरी व प्रकल्पग्रस्तांवर आर्थिक व मानसिक अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत म्हणून नुकसान भरपाई देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नुकसान भरपाई चे स्वरुप किती आखण्यात आले वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

पकडीगुडडम प्रकल्पाची प्रकल्पीय सिंचन क्षमता ३७१० हेक्टर असून बिगरसिंचनाच्या पाणी आरक्षणामुळे ९४३ हेक्टर सिंचनात कपात होते.

परंतु, सन २०१४-१५ मध्ये अत्यल्प पाऊस झाल्यामुळे पाणी उपलब्धतेनुसार ६६३ हेक्टर खरिप क्षेत्राला सिंचन करण्यात आलेले आहे. खरीप हंगामा अखरे धरणात ३.८६ दलघमी साठा शिल्लक होता. परंतु, बिगरसिंचनासाठीचे आरक्षण वगळता सिंचनासाठी पाणी शिल्लक नसल्यामुळे रब्बी हंगामात पाणी देता आले नाही.

(३) व (४) नाही.

कंपनीला केलेला पाणी पुरवठा शासन मंजूरीनुसार आहे. सदर कंपनीकडून सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने रु. ५६०.५० लक्ष निधी वसूल करण्यात आलेला आहे. पकडीगुडडम प्रकल्पाची उंची वाढवून २.५०५ दलघमी अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. उंचीवाढीनंतर लाभक्षेत्रातील सर्व लाभधारकांना पाणी मिळणार आहे. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहारा (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथील लघुपाटबंधारे धरणातील पिण्यासाठी असलेला जलसाठा शेतकरी पिकांकरीता विनापरवाना उपसा करीत असल्याबाबत**

**(६) ३७८५१ (२१-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथे बांधण्यात आलेल्या लघुपाटबंधारे धरणात गावाच्या पिण्यासाठी असलेला जलसाठा शेतकरी पिकांकरीता विनापरवाना उपसा करीत असल्याचे माहे आक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या धरण क्षेत्रात असलेल्या जलाशयात भटक्या समाजातून मिरगल सोसायटीत उपजीविकेसाठी मत्सबीज सोडले जात असल्याने त्यांच्यावरही विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२१-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) नाही. लोहारा लघु पाटबंधारे प्रकल्पात दि. १५/१०/२०१५ रोजी ०.५८२ दलघमी म्हणजे ४०% पाणीसाठा उपलब्ध होता. त्यापैकी पिण्याकरिता आवश्यक ०.१३ दलघमी पाणीसाठा आरक्षित करण्यात आला असून जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार पिण्याकरिता पाणी पुरविण्यात आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) जलाशयातील पाठीसाठा कमी झाल्यामुळे मच्छिमारांचे काही प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. ही वस्तूस्थिती आहे. पाणीसाठा कमी होत जात असल्यामुळे अधिकचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी संस्थेच्या मच्छिमारांकडून तलावात मासेमारी करण्यात आली आहे. संस्थेकडून आर्थिक नुकसानीबाबत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी धरणावर सुरक्षा रक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(७) ४१०२४ (०४-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी धरणावर आजपर्यंत सुरक्षा रक्षकांची रिक्त पदे भरण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण परिसरात दोन ट्रक स्टीलची चोरी झाली असल्याचे डिसेंबर मध्ये तसेच धरणावर ओल्या पार्ट्या आणि प्रेमी युगलांचा वावर असल्याचे माहे जानेवारी,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धरणाच्या सुरक्षेच्या उपलब्ध क्षमतेच्या ९० टक्के कर्मचारी निवृत्त झाले असून ही नोकरी सरकारी नसल्याने हंगामी मजूर व पहारेकरी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षारक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६)** :(१) दुधगंगा प्रकल्पाच्या देखीभालीची व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या आस्थापनेवरील १० चौकीदार व ३६ मजूर कार्यरत आहेत. धरण सुरक्षिततेकरिता धरणावर पोलीस सुरक्षा नेमण्यात आली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
दुधगंगा धरण परिसरात उपविभागाच्या साठयावरील ५.२१९ मेट्रीक लोहसळीची चोरी झाल्याचे दिनांक १०.१०.२०१५ रोजी निदर्शनास आले आहे. त्याबाबत एफ.आय.आर. दाखल केली आहे. तसेच इतर गैरप्रकारांबाबत पोलीसांकडे जलसंपदा विभागाकडून तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) सद्य:स्थितीत सुरक्षा पोलीस यंत्रणा व जलसंपदा विभागामार्फत संयुक्तपणे मोहिम राबविली जात असल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर मनपा ने जलसंपदा विभागाची थकबाकी न भरल्याने शहराचा पाणी पुरवठा बंद होण्याची शक्यता असल्याबाबत

**(८) ४१०९८ (०५-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उजनी धरणातून सोडलेल्या पाण्याची जलसंपदा विभागाची थकबाकी रुपये ७ कोटी ६३ लाख तसेच पुढील वर्षासाठी लागणाऱ्या पाण्याची अर्धी रक्कम (१५ कोटी) असे एकूण रक्कम रुपये २२ कोटी ६३ लाख सोलापूर महानगरपालिकेने भरले नसल्याने शहराला उजनी धरणातून पाणी पुरवठा होण्यास विलंब होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चालू आवर्तन मिळण्यासाठी रुपये २२ कोटी ६३ लाख भरण्याची सूचना विभागीय आयुक्तांनी मनपा अधिकाऱ्यांना देऊन सुद्धा अजूनही रक्कम भरण्यात आली नाही, असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलसंपदाची थकीत रक्कम भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-११-२०१६) :**(१) नाही.

(२) सोलापूर महानगरपालिकेकडे असलेली पाणीपट्टीची थकबाकी रक्कम रु. २२.८० कोटी अद्याप भरलेली नाही.

(३) पाणीपट्टी रक्कम भरणेबाबत आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना वेळोवेळी क्षेत्रियस्तरावर पत्रव्यवहार करणेत आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेतील योजनांच्या खर्चापेक्षा कर्मचाऱ्यांचा पगाराचा खर्च अधिक असल्याबाबत**

**(९) ४१४०२ (०६-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या महत्वाच्या योजना सन २०१२ मध्ये जिल्हा परिषदेकडून राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना हस्तांतरित करण्यात आल्यामुळे जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना काही काम उरलेले नसल्याने सदर कर्मचारी हे केवळ हजेरी पटासाठी जिल्हा परिषदेत येतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनांचा खर्च २ कोटी तर पगाराचा खर्च अडीच कोटी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-११-२०१६) :**(१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

सन २०१२-१३ अखेर जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत केंद्र पुरस्कृत योजना अंतर्गत कृषी निविष्ठा ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पुरविण्यात येत होत्या, तथापि सन २०१३-१४ या कालावधीत सदर योजनामधील कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद स्तरावरील खर्च कमी करण्यात आलेले आहेत.

सन २०१५-१६ मध्ये राज्य पुरस्कृत पीक संरक्षण, राष्ट्रीय बायोगॅस, जिल्हा नियोजन समितीकडील योजना व जिल्हा परिषद योजनेवरील एकूण अनुदान खर्च रुपये १४.८७/- (चौदा कोटी सत्याऐंशी लाख) आहे. तर पगारावरील वेतन व भत्ते खर्च रुपये ३.४४/- (तीन कोटी चौव्वेचाळीस लाख) आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री. क्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्यांतर्गत दुरुस्ती करण्याबाबत**

**(१०) ५९२५२ (२६-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र भीमाशंकर येथे असलेल्या गुप्त भीमाशंकर, दगडी रस्ता आणि कोटेश्वर मंदिराची दुर्दशा झालेली असल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. क्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्यांतर्गत दुरुस्ती करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ मे २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री, पुणे यांस निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने पुरातन वास्तू व विकास कामे श्री.क्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्यांतर्गत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-११-२०१६) :** (१), (२), (३) व (४) श्री.क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडयाबाबत मा.पालकमंत्री, पुणे यांना निवेदन देण्यात आलेले आहे. नियोजन विभागाच्या दिनांक २३/११/२०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार श्रीक्षेत्र भीमाशंकर तिर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास मान्यता देण्यात आली आहे. आराखडयानुसार मंजूर असलेल्या रस्त्याच्या कामासाठी वन जमिन मागणी प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी वन्यजीव विभागाकडे दि.१२.७.२०१५ रोजी वनविभागाच्या संकेतस्थळावरून सादर केला असून वन विभागाच्या शेऱ्यांची पूर्तता करून १०.०९.२०१५ रोजी मंजूरीसाठी फेरसादर केला आहे. तथापि, सदर प्रस्ताव वन्यजीव विभागाकडे प्रलंबित आहे.

---

**राज्यांतर्गत आंतर खोरे पाणी परिवहन करण्याबाबत**

**(११) ५९५११ (२६-०८-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट जल सिंचन आयोगाने १९९९ च्या अहवालात राज्यात आंतर खोरे पाणी परिवहन करुन विपुलतेच्या खो-यातून तुटीच्या खो-यात पाणी आणण्याबाबत शिफारस करुन सन २००३ पासून अनेक वेळा शासनास प्रस्ताव सादर केल्याचीही बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे, महाराष्ट्र जलसिंचन आयोगाने १९९९ च्या अहवालात राज्यात आंतरखोरे पाणी परिवहन करुन विपुलतेच्या खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यात पाणी आणण्याच्या योजनांचा अभ्यास करणेबाबत शिफारस केली आहे. आंतरनदी जोड योजनेबाबत मे, २००२ मध्ये महाराष्ट्र पाणी परिषदेने प्रस्ताव शासनास सादर केले होते.
(२) महाराष्ट्र शासनाने दिनांक १० जून, २००९ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय जलविकास अभिकरणास (NWDA) राज्यांतर्गत २९ नदी जोड योजनांचा सविस्तर अभ्यास करण्याची विनंती केली होती. या योजनापैकी राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने विदर्भातील वैनगंगा (गोसीखुर्द) नळगंगा (पुर्णा तापी) नदी जोड योजना व वैनगंगा-मांजराखोरे नदीजोड योजना याचे योग्यायोग्यता अहवाल तयार केले. यापैकी वैनगंगा-मांजरा खोरे जोड योजना असफल आढळून आली व शासनाने दिनांक १२.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये रद्द केल्याचे राष्ट्रीय जलविकास अभिकरणास कळविले. सद्यस्थितीत राष्ट्रीय जलविकास अभिकरणाकडून वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डव्हा (ता.मालेगांव, जि.वाशिम) येथील नाथगंगे महाराज संस्थान या ब-वर्ग तीर्थक्षेत्राचे विकास आराखड्यातील उर्वरित कामासाठी निधी देण्याबाबत**

**(१२) ५९६३४ (२३-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डव्हा (ता.मालेगांव, जि.वाशिम) येथील नाथगंगे महाराज संस्थान या ब-वर्ग तीर्थक्षेत्राचे विकास आराखड्यातील उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याकरिता मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनानुसार नाथगंगे महाराज संस्थान या ब-वर्ग तीर्थक्षेत्राचे विकास आराखड्यातील उर्वरित कामासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) श्री.नाथगंगे महाराज संस्थान, डव्हा, ता.मालेगांव, जि.वाशिम या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पोचमार्गाचे रुंदीकरण या कामांकरिता सन २०१३-१४ मध्ये १२३.३४ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर तीर्थक्षेत्रास रु.२.०० कोटी इतक्या निधीच्या मर्यादेतील उर्वरित निधी रु.७६.६६ लक्ष उपलब्ध करुन देण्याकरीता, प्रस्तावित कामांची चालू दरसूचीवर आधारीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या तांत्रिक मान्यतेची अंदाजपत्रके शासनास सादर करणेबाबत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, वाशिम यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील खार जमिनीची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) ५९८४४ (२९-०८-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील खार जमिनींची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. जलसंपदा मंत्री महोदयांकडे देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनातील प्रमुख मागण्या कोणत्या व त्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२४-१०-२०१६) :**(१) होय.

(२) सदरहू निवेदनात सांडोर, कौलार, पाणजु, रानगांव भुईगांव व मुळगांव किल्ला या खारभूमी योजनांची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत मागणी केली आहे. त्याअनुषंगाने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

कौलार खारभूमी उघाडीला दरवाजे बसविणे व खांडी दुरुस्ती करण्याचे काम करण्यात आले आहे. मुळगाव किल्ला खारभूमी योजनेच्या दोन्ही उघाडीला दरवाजे बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

पाणजू खारभूमी योजनेच्या नुतनीकरणाचे काम राष्ट्रीय चक्री वादळ व आपत्ती निवारण प्रकल्पांतर्गत समाविष्ठ करण्यात आले आहे.

रानगाव भुईगाव खारभूमी योजनेस ६ गेट बसविण्याचे काम व सांडोर खारभूमी योजनेच्या दुरुस्तीचे काम निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर येथील रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या पाझर तलावाचे पुनरुज्जीवन करण्याबाबत**

**(१४) ५९९८६ (२४-०८-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन १९७२ मध्ये पडलेल्या दुष्काळाच्या काळात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या पाझर तलावांचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी अहमदनगर येथील ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्रान्वये केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने पाझर तलावांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कार्ले (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील धरणावर बांधण्यात आलेल्या चौकीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१५) ६०१३४ (२६-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीवर्धन (जि.रागयड) तालुक्यात असलेल्या कार्ले धरणावर बांधण्यात आलेल्या चौकीच्या इमारतीची दुरुवस्था झाल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकीची इमारत सन १९७४ साली बांधलेली असून संबंधित खात्याच्या दुर्लक्षामुळे कार्ले धरणातून गेल्या दोन वर्षापूर्वी गळती झाल्याने सदर धरणाची डागडुजी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर कार्ले धरणातून अंदाजे २५ ते ३० हजार लोकवस्ती असलेल्या बोर्लीपंचतन, भरडखोल, दिवेआगर, खुजारे, कार्ले, या गावातील ग्रामस्थांना पाणी पुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर इमारत नव्याने बांधण्यात यावी अशी मागणी तेथील स्थानिक नागरिकांकडून होत असल्याने या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६)** :(१) होय.
(२) चौकीची इमारत १९८५ साली बांधण्यात आली होती. कार्ले धरणातून गळती होत होती हे खरे आहे. त्याअनुषंगाने सन २०१४-१५ साली नवीन विमोचकाचे काम विशेष दुरुस्ती अंतर्गत करण्यात आली आहे.
(३) होय.
(४) नवीन इमारत बांधणेऐवजी दुरुस्त करणे संयुक्तीक आहे. त्यामुळे सदर इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील समन्यायी पाणीवाटपाच्या आराखडयाबाबत**

**(१६) ६०४३६ (२६-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समन्यायी पाणीवाटपाचा आराखडा दोन महिन्यात तयार करण्याची घोषणा शासनाने केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१६)** :(१) हे खरे नाही. तथापि मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७/१/२०१५ रोजी मुंबई येथे झालेल्या पहिल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत गोदावरी खोऱ्याचा जल आराखडा जलसंपदा विभागाने ३१ मार्च २०१५ अखेर राज्य जल मंडळास सादर करावा असे ठरले होते.
(२) गोदावरी खोरे महामंडळातर्फे गोदावरी खोऱ्याचे अंतिम अहवाल दि.३०/३/२०१५ ते २९/४/२०१५ चे दरम्यान शासनास सादर झालेले होते. त्यानंतर मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९/११/२०१५ रोजी मुंबई येथे झालेल्या दुसऱ्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत विशेष निमंत्रितांच्या अभिप्रायाचा अभ्यास करून सर्व समावेशक अहवाल असणे आवश्यक आहे. त्यादृष्टिने शासनाच्या अधिकाऱ्याव्यतिरिक्त अशासकीय तज्ञ व्यक्तीसह समिती स्थापण्यात यावी व अभ्यासपूर्वक जल आराखडा तयार करावा, असे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने तज्ञ समिती शासन निर्णय दि.१२/४/२०१६ नुसार स्थापन झाली आहे. तज्ञ समितीच्या अहवाल अंतिम करण्यास्तव आतापर्यंत दि.२७ मे, २०१६, दि. १६ जुलै, २०१६, दि.६ ऑगस्ट, २०१६, दि.३ सप्टेंबर, २०१६, दि.२३ सप्टेंबर, २०१६ व दि.३० सप्टेंबर, २०१६ अशा सहा बैठका झाल्या आहेत. तज्ञ समिती मार्फत गोदावरी खोऱ्याचा अहवाल अंतिम करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील गिरण्या उजवा कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) ६०६७७ (२३-०८-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील गिरण्या उजवा कालव्यास काटेरी झुडपांनी घेरले असून त्याची दुरवस्था झाली आहे परंतु याकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालव्यातून देवळा व मालेगाव तालुक्यातील अनेक गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी मिळते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कालव्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जलसंपदा विभागाचे या बाबींकडे दुर्लक्ष झाले नसून कालव्याच्या बाहेरील बाजूस असणाऱ्या उतारावरील काटेरी झुडुपे यांत्रिकी विभागाकडून काढण्यात येत आहेत.

(२) होय.

देवळा व मालेगाव तालुक्यातील सुमारे १५० पाझर तलाव/गावतळे पावसाळयात उपलब्ध पूर पाण्याने भरुन देण्यात येतात.

(३) यांत्रिकी विभागामार्फत सन २०१५-१६ मध्ये पाखरण कार्यक्रमांतर्गत मुख्य कालवा ० ते ७.५ कि.मी व वाढीव कालवा ० ते २ कि.मी. मधील दोन्ही बाजूकडील तसेच वितरीका क्र. १ व ३ मधील झाडे - झुडुप काढण्यात आलेली आहेत. तसेच सन २०१६-१७ मध्ये पाखरण कार्यक्रमांतर्गत मुख्य कालवा ७.५ ते २० कि.मी. व वाढीव कालवा २ ते ११ कि.मी. कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मागास क्षेत्र अनुदान निधी (बी.आर.जी.एफ) अंतर्गत कर्मचारी यांचे १४ व्या वित्त आयोगात समायोजन करण्याबाबत

**(१८) ६०८०६ (२९-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागास क्षेत्र अनुदान निधी (बी.आर.जी.एफ) योजना दिनांक ३० जून, २०१६ रोजी समाप्त होवून त्या अंतर्गत मागील ६ वर्षापासून काम करणारे १२ जिल्ह्यातील ४५० कर्मचारी बेरोजगार होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या पंचायत राज यांच्याकडील पत्र क्रमांक जी.३९०११/०४/२०१५-एफ.डी. मंत्रालय, नवी दिल्ली दिनांक १६ डिसेंबर, २०१५ अन्वये आर्थिक अडचण असल्यास केंद्र शासनाच्या १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत आमचा गाव आमचा विकास योजनेअंतर्गत मागास क्षेत्र अनुदान निधीयोजने प्रमाणेच कंत्राटी कर्मचारी घेण्याबाबत केंद्र सरकारने सुचविले असून १० टक्के प्रशासकीय निधीच्या खर्चातून कर्मचाऱ्यांचे वेतन भागविण्यात यावे असे ही सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ४५० कर्मचाऱ्यांना १४ व्या वित्त आयोगा अन्वये समायोजनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :**(१) मागास क्षेत्र अनुदान निधी (बी.आर.जी.एफ) योजना केंद्र शासनाने दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये बंद करण्याबाबत कळविले असुन राज्यशासनाच्या उच्चधिकार समितीच्या दिनांक २२ मे, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. पंरतू योजनेचा चालू असलेली कामे पूर्ण करण्यासाठी

योजनेची चालू असलेली कामे पूर्ण करण्यासाठी उपलब्ध निधीच्या अधिन राहून जिल्ह्यांना मुदतवाढ देण्याबाबत वेळोवेळी निर्णय घेण्यात आलेला आहे. दिनांक ३१ जुलै, २०१६ रोजी योजना जिल्हा पातळीवर बंद करुन केंद्रशासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
केंद्र शासनाच्या दिनांक ०८/१०/२०१५ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये १४ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत स्वराज्य संस्थांनी विनियोग करतांना तांत्रिक व प्रशासकीय बाबींवर जास्तीत जास्त १० टक्के खर्च करण्याबाबत सुचविले आहे. तसेच केंद्र शासनाच्यादिनांक १६.१२.२०१५ च्या पत्रांन्वये १४ व्या वित्त आयोगाच्या १० टक्के निधीबाबत प्रशासकीय व तांत्रिक स्वरुपाच्या खर्चाच्या विनियोगाबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील १७ प्रकल्पांसाठी आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत

**(१९) ६०९९८ (२३-०८-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १७ प्रकल्पांसाठी सन २०१४-१५ मध्ये एकूण रु. १४६६.६९ कोटी रुपयांचे केंद्र शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळणार होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६)** :(१) होय, सन २०१४-१५ या वर्षात रु. ३२ कोटी एवढे आर्थिक सहाय्य केंद्र शासनाकडून प्राप्त झाले आहे.
(२) सन २०१४-१५ मध्ये वेगवर्धीत सिंचन लाभ मिळण्याबाबत मा.मुख्यमंत्री, यांनी जानेवारी, २०१५ मध्ये व मा.मंत्री (जलसंपदा) यांनी दि. ०४.०३.२०१५ रोजी केंद्रिय जलसंसाधन मंत्री यांना पत्राद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटीतून विनंती केली होती.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आलेवाडी (ता.संग्रामपूर, जि.बुलडाणा) येथील गृहत लघ पाटबंधारे प्रकल्पाचे कोणतेही सर्वेक्षण न करता मान्यता घेतल्याबाबत

**(२०) ६१११६ (२३-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आलेवाडी (ता.संग्रामपूर, जि.बुलडाणा) येथील बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाकरिता संबधित विभागातील आदिवासी शेतक-यांची मान्यता घेण्यात आलेली नसून या प्रकल्पाला कोणतेही सर्वेक्षण न करता कागदोपत्री सर्वेक्षणावरुन शासनाची मान्यता घेण्यात आल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गैरकायदेशीर मान्यता घेण्यात आल्याचे या विभागातील आदिवासी शेतकरी व भूमिहीन यांच्यामध्ये नाराजी असून शासनाच्या नियमानुसार प्रकल्पाची भिंत गावापासून २०० मीटर असतानाही नियमानुसार गांवाच्या पुनर्वसनाचा विचार करण्यात आला नसल्याचे डॅम लाईन व बुडीत क्षेत्रामध्ये ९० टक्के अल्पभुधारक आदिवासी शेतकरी भूमिहीन होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
आलेवाडी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषण करण्यात येऊन शासनाचे प्रचलित निकषानुसार दि. २७.०२.२००९ ला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
आलेवाडी बृहत लघु पाटबंधारे योजनेपासुन आलेवाडी गावठाण बाधीत होत नसल्यामुळे पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील जमिनीपैकी ६८ टक्के जमिन आदिवासी शेतकऱ्यांची आहे. बुडीत क्षेत्रातील भुसंपादनाची कार्यवाही संयुक्त मोजणी स्तरावर असुन मोजणीचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर भुमिहीन खातेदाराकडील तपशिल निश्चित होऊ शकेल.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा येथील तालुकास्तरीय समितीच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत

**(२१) ६१३७७ (२३-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा येथे सन २०१६-१७ पासून १४ व्या केंद्रीय वित्त आयोगातील निधी खर्च करताना आमच गाव, आमचा विकास, या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायतींचा विकास आराखडा करुन निधीचा विनियोग करावयाचा आहे मात्र पाणी पुरवठ्यासह इतर अनेक कामासाठी ग्रामपंचायतीनी पाठविलेल्या प्रस्तावांना तालुकास्तरीय समितीने गेल्या ५ महिन्यात निर्णय न घेतल्याने कामे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन तातडीने संबंधित तालुकास्तरीय समितीच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :**(१) नाही.

राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडील दिनांक १२/०५/२०१६ च्या पत्रानुसार ३ दिवसीय लोकसहभागीव नियोजन प्रक्रिया दिनांक १५/०८/२०१६ पर्यत पूर्ण करण्याच्या सुचना होत्या. त्यामुळे मे, २०१६ मध्ये प्रस्ताव प्रलंबित राहण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(२) ज्या ग्राम पंचायतींनी ३ दिवसीय लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया पूर्ण करुन तालुका स्तरीय छाननी समितीकडे आराखडे मंजुरीसाठी सादर केले आहेत. अशा आराखडयांना तालुका स्तरीय समितीमार्फत मंजूरी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील उरमोडी धरणाच्या कालव्याची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२२) ६१३७८ (११-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील उरमोडी धरणाच्या कालव्याची कामे अपूर्ण असून जी कामे पूर्ण झाली आहेत ती तांत्रिकदृष्ट्या चुकीची झाल्याने कालव्यातून पाणी पुढे सरकत नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार कामात त्रुटी करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
उरमोडी पाटबंधारे प्रकल्पांतर्गत एकूण कालवयाची लांबी १७५.८३ कि.मी. असून ११४.८३ कि.मी कालव्याची कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच एकूण ९८.८३ कि.मी कालव्याच्या लांबीमध्ये पाणी सोडण्यात आले असून त्याद्वारे जून, २०१४ अखेर ७२९४ हेक्टर सिंचन क्षमता निर्मित झालेली आहे.

तसेच उरमोडी उपसा सिंचन योजनेअंतर्गत टप्पा क्र.१ वाठार किरोली व टप्पा क्र.२ कोंबडवाडी येथील कामे करुन उपसा सिंचन योजनेतील तीन पैकी एक पाईपलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे. खटाव कालवा कि.मी १ ते ७६ पर्यंतची आवश्यक कामे पूर्ण करुन सद्यस्थितीत कि.मी. ७६ पर्यंतच्या भागात व त्यापुढे माण कालव्याच्या कि.मी. ५ पर्यंत टंचाई परिस्थितीत पाणी सोडण्यात येत आहे.

खटाव कालवा कि.मी. ७१ मधील सा.क्र.७०/१८० मी. ते माण बोगदा खोल खंदक व माण कालवा कि.मी. क्र.१ ते ५ या लांबीतील कालव्यामध्ये सिंचनासाठी व दुष्काळी परिस्थितीमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नियमितपणे आवर्तने सोडली जातात. कालव्यावरील असलेल्या थेट विमोचक व वितरीकांसाठीचे शिर्ष विमोचक यांच्या स्थानिकांकडून होणाऱ्या अनधिकृत परिचलनाने आवर्तनामध्ये अडथळा निर्माण होतो. त्यामुळे आवर्तन कालावधीमध्ये माण कालवा कि.मी. ५ येथे मिळणारा विसर्ग हा कमी जास्त होतो. कालव्याची कामे तांत्रिकदृष्ट्या चुकीची झाल्याने कालव्यातून पाणी पुढे सरकत नाही अशी वस्तुस्थिती नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयातील ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर व मिनी आय.टी.आय.पारनेर येथील कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबत

**(२३) ६१४०७ (२९-०८-२०१६). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर व मिनी आय.टी.आय. पारनेर येथील कर्मचाऱ्यांबाबत औरंगाबाद उच्च न्यायालय यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी सुनावणी होऊन सदरील कर्मचा-यांना दिनांक ३१ जुलै, २०१५ पर्यंत शासकीय सेवेत सामावून घेण्याचे आदेश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील चिकोत्रा खोरे समन्यायी पाणी वाटप व वापर कृती संशोधन पथदर्शी प्रकल्पास मान्यता मिळण्याबाबत

**(२४) ६१४८० (२६-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील चिकोत्रा खोरे समन्यायी पाणी वाटप व वापर कृती संशोधन पथदर्शी कार्यक्रमास शासनाची मान्यता दिली असून या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दिनांक १२ मे, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांनी तीन महिन्यांच्या कालावधीत आवयक ते प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी समन्यायी पाणी हक्क परिषद, पुणे यांना मातृसंस्थेचा दर्जा देणे, सहा गावांच्या पथदर्शी प्रकल्पाला मान्यता देणे असे अनेक प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेच्या धर्तीवर सदरचा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असून आवयक त्या प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रस्तावात विलंब होण्याची कारणे कोणती आहेत व प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे या प्रकल्पाचे काम सद्य:स्थितीत स्थगित ठेवण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कासा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी भागातील ग्रामपंचायतीच्या विभाजनाच्या प्रस्तावाबाबत**

**(२५) ६१५६४ (२६-०८-२०१६). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कासा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी भागातील ग्रामपंचायती ४० वर्षापासून विभाजनाच्या प्रतिक्षेत असून तीन ते चार गावांसाठी एकच ग्रामपंचायत असल्यामुळे गावपाड्याचा विकास होत नाही तसेच विकास कामावर मर्यादा येत असल्यामुळे ग्रामपंचायतीने ग्रामसभेत विभाजनाचा प्रस्ताव मंजूर करुन तो प्रस्ताव दिनांक ५ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास ग्रामविकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनाकडून अद्याप मंजूरी न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रस्तावास मंजूरी देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंपत्ती अधिनियमात फेरबदल करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२६) ६१९६१ (२०-०८-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जलसंपत्ती प्राधिकरणात मेंढेगिरी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालानुसार जलसंपत्ती अधिनियमात फेरबदल करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिनियमात फेरबदल करण्याची कारणे काय आहेत व बदलाचे स्वरुप काय राहणार आहे,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :**(१) होय.

दि.शासन निर्णय क्र. मजनिप्रा-२०१३/प्र.क्र. (६८/१३)/ जसं (आस्था), दि.१९ सप्टेंबर, २०१३ दि. १३ डिसेंबर, २०१३ व दि. ७ मे, २०१४ अन्वये श्री.हि.ता.मेंढेगिरी (महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद) यांचे अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना करणेत आली आहे.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या कामकाजाची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होणेसाठी अधिनियमात सुधारणा करणे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, २०१६ अधिनियमातील बदलाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे :-

१) कलम (३)(३) प्राधिकरणाचे मुख्यालय हे राज्य शासन अधिसुचित करेल अशा अन्य ठिकाणी असेल.

२) कलम ३ (४) प्राधिकरण हे अध्यक्ष आणि अन्य ४ सदस्य यांचे मिळून बनलेले असेल.

३) प्रकरण दोन मध्ये कलम ३ (क) हे नव्याने अंर्तभूत केले आहे. कोणत्याही कारणामुळे प्राधिकरण पुनर्घटीत करण्यात आले नसेल तेव्हा, शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा, अपर मुख्य सचिवाचे किंवा त्यास समतुल्य असणारे पद धारण करणारी व्यक्ती, जी अध्यक्ष म्हणून काम करील, आणि सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, आणि प्रधान सचिव / सचिव, वित्त विभाग, जे सदस्य म्हणून काम करतील, यांचे मिळून बनलेल्या समितीकडून, प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये ही, वापरण्यात येतील, करण्यात येतील; आणि पार पाडण्यात येतील, आणि उक्त समिती, सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर किंवा प्राधिकरण यथोचितरित्या पुनर्घटित करण्यात येईल तेव्हा, यांपैकी जे अगोदर घडेल त्यानंतर, प्राधिकरणाचे अधिकार वापरण्याचे, कार्ये करण्याचे व कर्तव्ये पार पाडण्याचे बंद करील.

४) कलम ४ (१) (क) अध्यक्ष हा, जी व्यक्ती मुख्य सचिव किंवा त्याच्या समतुल्य दर्जाची राज्य शासनाची अधिकारी आहे किंवा होती अथवा उच्च न्यायालयाचा सेवा निवृत्त न्यायमूर्ती आहे, अशी व्यक्ती असेल.

(ख) एक सदस्य, जो जलसंपदा अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ञ असेल.

(ग) एक सदस्य, जो अर्थव्यवस्था क्षेत्रातील तज्ञ असेल.

(घ) एक सदस्य, जो भूजल क्षेत्रातील तज्ञ असेल.

(ड) एक सदस्य, जो विधी क्षेत्रातील तज्ञ असेल; आणि

(च) प्रत्येक नदी खोरे प्राधिकरणाच्या क्षेत्रातून १ याप्रमाणे, ५ विशेष निमंत्रित असतील.

परंतु, किमान एक विशेष निमंत्रित ही, महिला असेल.

५) कलम ४ (१) मध्ये नमूद केलेले सदस्य व तज्ञ यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाची किंवा संस्थेची स्नातक पदवी किमान शैक्षणिक अर्हता आणि त्यांच्या क्षेत्राशी संबंधित वीस वर्षाहून कमी नाही इतका कार्यसिध्द अनुभव धारण केलेला असेल.

६) कलम ५ (१) निवड समितीमध्ये मुख्य सचिव व अध्यक्ष असतील तसेच सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास), जलसंपदा विभाग, संचालक, भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई व प्रख्यात संस्थेमधून शासनाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती असे ५ सदस्य असतील.

(३) शासन राजपत्रातील दि.८ जुलै, २०१६ च्या अधिसुचनेद्वारे, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१६ नुसार कलम ३ (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील समिती स्थापन करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती मालिनी शंकर<br>अपर मुख्य सचिव | : अध्यक्ष |
| २ | श्री.व्ही.गिरीराज<br>प्रधान सचिव, वित्त विभाग | : सदस्य |
| ३ | श्री.शि.मा.उपासे<br>सचिव, जलसंपदा विभाग | : सदस्य |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुर्बीण यंत्राचा वापर न करता येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागातील अभियंत्यांना निलंबित करण्याबाबत

**(२७) ६१९६४ (१०-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्बीण यंत्राचा वापर न करता येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागातील १८ अभियंत्यांना तात्काळ निलंबित करण्याबाबत व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.उन्हाळे यांनी तारांकित प्रश्नाची चुकीची व खोटी माहिती देऊन दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई शासनाकडे प्रस्तावीत असून ती कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री,

मा.ग्रामविकास मंत्री, मा.पालकमंत्री अकोला जिल्हा, जिल्हाधिकारी, अकोला व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अकोला यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार लघु सिंचन विभागातील १८ अभियंता व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.उन्हाळे यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१०-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) नाही. लघुसिंचन विभाग जि.प. अकोला अंतर्गत १८ अभियंत्यांना (सध्या कार्यरत १७) त्यांचे कार्यक्षेत्रावर दुर्बीण यंत्राद्वारे मोजणी व ले आऊट देण्याचे कामाकरिता आवश्यक तांत्रीक ज्ञान त्यांचेकडे असल्याने व त्या प्रकारचे काम करित असल्याने कारवाई करण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला पाटबंधारे विभागातील मुर्तिजापूर मतदार संघास देखभाल दुरुस्ती अंतर्गत निधी मिळण्याबाबत**

**(२८) ६१९६९ (२०-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देखभाल दुरुस्ती अंतर्गत अकोला पाटबंधारे विभागातील मुर्तिजापूर मतदार संघास निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दि. २८ जुलै, २०१५ रोजी मा. वित्त मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू अकोला पाटबंधारे विभागातील मुर्तिजापूर मतदार संघास निधी मिळण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) होय.
(२) सन २०१५-१६ मध्ये देखभाल दुरुस्तीकरीता रु. २९६.२८ लक्ष निधी प्राप्त झाला होता. त्यामधूनच मुर्तिजापूर तालुक्यातील कामावर खर्च करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोयना प्रकल्पाअंतर्गत कार्यालय अन्य ठिकाणी स्थलांतरीत केल्याबाबत**

**(२९) ६१९७७ (२३-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोयना प्रकल्पाचे कृष्णानगर सातारा येथील अधिक्षक अभियंता वीज व यांत्रिक उभारणी मंडळ बंद करुन या कार्यालयाकडे असणारी आस्थापना नव्याने प्रस्तावित करण्यात आलेल्या मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना (कालवे) नाशिक या मंडळासाठी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान वर्ग करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणारे एक विभागीय कार्यालय व तीन उपविभागीय कार्यालयांचे स्थलांतर वाशीम, यवतमाळ व पुसद या विदर्भातील ठिकाणी करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा येथील कार्यालयांतर्गत कार्यालय अन्य विभागात स्थलांतरीत करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी आपला विरोध मा. मुख्यमंत्री यांना कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) बंद केलेल्या/स्थलांतरित केलेल्या कार्यालयांना पुरेसे काम नसल्याने अशी कार्यवाही केलेली आहे. कोयना प्रकल्प कामासाठीची आवश्यक विद्युत व स्थापत्य विभागीय कार्यालये कोयनानगर व अलोरे येथे कार्यरत ठेऊन एकच विभागीय कार्यालय व त्याअंतर्गत उपविभाग स्थलांतरित करण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(३०) ६२०३० (१०-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा परिषद बांधकाम सभापती यांनी आपल्या विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या विविध कामांमध्ये ५० कोटी हून अधिक रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सभापतींना नोकर भरतीमध्ये लाच घेताना पकडण्यात आलेले आहे तसेच बांधकाम समितीच्या सभेमध्ये सचिवांच्या स्वाक्षरीशिवाय कोट्यवधी रुपयांचे ठराव मंजूर करून ती कामे अवैधपणे वितरीत करून गैरव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या विरोधात भ्रष्टाचार व लाचलुचपत प्रकरणात चौकशी व न्यायालयीन प्रकरणे सुरु असून त्यांच्यावर अजूनपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषीवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) जिल्हा परिषद गडचिरोली मध्ये अशी घटना घटलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर (उत्तर) या मतदार संघातील तालीम संस्था व सार्वजनिक हितासाठी स्थानिक विकास निधीतून कामे करण्याकरिता मंजूरी मिळण्याबाबत**

**(३१) ६२०८८ (२६-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र विधानसभा सदस्यांना विकास निधीला मार्गदर्शक तत्वामध्ये ट्रस्ट अंतर्गत रजिस्टर असणा-या संस्थांच्या सार्वजनिक हिताचा कामाकरिता निधी देता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९९५ ते २००९ या काळात विधानसभेच्या तीन टर्म मध्ये कोल्हापूर शहरातील सार्वजनिक न्यासाअंतर्गत रजिस्टर असणा-या अनेक संस्थांना, तालीम संस्थाना खास बाब म्हणून निधी देऊन त्यांची नुतनीकरण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नियोजन मंडळाच्या पुणे येथे होत असणा-या विभागीय बैठकांमध्ये तसेच दिनांक ३ मे,२०१६ रोजी वा त्यासमुरास मा. अर्थ व नियोजन मंत्री यांनी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये खासदार व आमदार निधीच्या मार्गदर्शक तत्वांची तुलना होऊन जी कामे खासदार निधीतून करता येतात पण आमदार निधीमध्ये करता येत नाहीत अशा कामांना (सार्वजनिक न्यासांतर्गत रजिस्टर असणा-या) खास बाब म्हणून मंजूरी देण्यात येईल असे जाहिर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोल्हापूर (उत्तर) या मतदार संघातील तालीम संस्था व सार्वजनिक हितासाठी (न्यासांतर्गत रजिस्टर असणा-या) स्थानिक विकास निधीतून कामे करण्याकरिता गेल्या दोन वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी मंजूरी मागत असूनही अद्यापपर्यंत मंजूरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-१०-२०१६)** :(१) होय.

(२) सदर कामे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत झालेली नसून सन २००९-१० मध्ये कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक सोयी सुविधांसाठी विशेष अनुदान योजनेंतर्गत मंजूर रु.४११२.५० लक्ष एवढ्या अनुदानातून कोल्हापूर शहरातील काही तालिम संस्थांच्या पुनर्बांधणी व दुरुस्तीसाठी विशेष अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार सदर कामे करण्यात आली आहेत.

(३) दि.१२.०७.२०१६ रोजीच्या मार्गदर्शक तत्वांच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३.३९ नुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करावयाच्या कामांसाठी विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याचे अधिकार मा.मंत्री (नियोजन) यांना आहेत.

(४) व (५) नाही, मा.विधानसभा सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे कोल्हापूर शहरातील ५ संस्थांना व्यायामशाळेचे बांधकाम करण्याकरिता एकूण रु.३२ लक्ष एवढी रक्कम सन २०१५-१६ च्या निधीतून देण्यास दि.७.९.२०१५ च्या ज्ञापनान्वये विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात आली हाती. तथापि महानगरपालिकेने हमीपत्र न दिल्यामुळे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदर कामास प्रशासकीय मान्यता दिली नाही.

मा.सदस्यांच्या दि.१.६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला एकूण १२ संस्थांना निधी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद अकोला येथील शिक्षक भरतीत झालेला गैरप्रकार**

**(३२) ६२०९८ (१०-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदे अंतर्गत (जि.अकोला) शिक्षण विभागात आंतर जिल्हा बनावट शिक्षक भरती व शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा परिषदेंतर्गत शिक्षण विभागातील शिक्षक भरती गैरप्रकार, साहित्य खरेदी मधील गैरव्यवहार याबाबत चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, अमरावती यांनी उपआयुक्त (आस्थापना) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २३ सप्टेंबर,२०१५ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती नेमली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने केलेल्या चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषीं अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६)** :(१) हे खरे नसून अकोला जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागातील आंतरजिल्हा शिक्षक बदली, अपंग शिक्षक नेमणूक, उर्दू शिक्षक भरतीमध्ये अनियमितता झाल्याचे चौकशीमध्ये दिसून आले आहे.

(२) होय.
(३), (४) व (५) चौकशीत समितीने शासनास सादर केलेल्या अहवालात अनियमितता झाल्याचे आढळून आले व त्यास अनुसरुन सदर प्रकरणी अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यास विभागीय आयुक्त अमरावती यांना दि. २/६/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त अमरावती यांनी त्यांच्या दिनांक १४ जून, २०१६ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अकोला जिल्हा परिषदेमध्ये जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**तलासरी व डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील तीन ते चार**
**गावासाठी एकच ग्रामपंचायत असल्याबाबत**

**(३३) ६२२०४ (२३-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तलासरी व डहाणू तालुक्यातील ग्रामपंचायती ४० वर्षापासून विभाजनाच्या प्रतीक्षेत असल्याचे दिनांक १४ जून, २०१६ रोजी निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तीन ते चार गावासाठी एकच ग्रामपंचायत असल्याने विकासकामांवर मर्यादा येत असल्याने ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ सिंचन महामंडळाकडे पडून असलेल्या निधीचे समायोजन करण्याबाबत**

**(३४) ६२३१० (११-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ सिंचन महामंडळाकडे पडून असलेला सुमारे २ हजार कोटी रुपयांचा निधी पैकी भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन इत्यादीसाठी किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(२) असल्यास, सदर बाबींसाठी निधीचे समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-१०-२०१६)** :(१) होय.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे माहे मार्च, २०१५ अखेर पतपत्र वितरणाप्रमाणे सुमारे रु.२५०५ कोटी इतका निधी विविध कारणांमुळे अखर्चीत होता. त्यापैकी मार्च २०१६ पर्यंत रु.१४२८ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला असून रु.१०७७ इतका निधी अखर्चीत आहे.

(२) मार्च, २०१५ अखेर शिल्लक निधी व वर्ष २०१५-१६ मध्ये प्राप्त निधी यासह एकूण उपलब्ध निधी रु. ६१२३ कोटी मंजूर भुसंपादन, पुनर्वसन व वनजमीन या शिर्षाअंतर्गत रु.२२८५ कोटी इतके वितरण करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेढी बॅरेज (ता.जि.अमरावती) प्रकल्पाचे काम बंद असल्याबाबत

**(३५) ६२४७८ (२९-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचनाच्या अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हयातील पेढी बॅरेज प्रकल्पाचे काम दोन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प सुरु होवून शेतकऱ्यांना या प्रकल्पाचे पाणी केव्हा उपलब्ध होणार आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१६)** :(१) होय.

(२) प्रकल्पाच्या सध्याच्या नियोजनानुसार सन २०१९-२०२० मध्ये प्रकल्प पूर्ण होऊन शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होईल.

(३) (अ) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या मौजा रोहनखेड व पर्वतापुर येथील प्रकल्पग्रस्तांनी अमरावती शहरालगत कठो-याजवळ मौजा रेवसा शिवारात पुनर्वसनाची मागणी दि.१५/०२/२०११ च्या ग्रामसभेच्या ठरावानुसार केली होती. परंतु रेवसा येथी नागरीकांची पुनर्वसनासाठी जमिन देण्यास विरोध तसेच जमिनीचे दर अधिक असल्यामुळे तात्कालीन राज्यमंत्री, यांनी दि.१५/११/२०१३ च्या बैठकीमध्ये रेवसा ऐवजी सरकारी जागेवर पुनर्वसन करण्याचे निर्देश दिलेत. त्यानुसार नांदुरा (ब) येथे निवडलेल्या सरकारी जागेवर पुनर्वसनासाठी प्रकल्पग्रस्तांचा विरोध होता. त्यामुळे पुनर्वसनासाठी होणारा अधिक विलंब टाळण्याकरिता पुनर्वसनाऐवजी एकमुस्त मोबदला देण्याबाबतचा प्रस्ताव महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०५/०४/२०१६ च्या पत्रान्वये मंजुर केला आहे व त्याबाबत पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(ब) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील मौजा दोनदच्या पुनर्वसनासाठी सरकारी व भोगवटदार वर्ग-२ जमिनीचा ताबा देण्याबाबतची कार्यवाही करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त अमरावती विभाग यांनी अधिनस्त अधिकाऱ्यांना दि. ३१/०८/२०१६ च्या बैठकीमध्ये दिलेले आहेत.
(क) बुडीत क्षेत्रातील जमिनीचा निवाडा प्रक्रिया भुसंपादन अधिकारी यांचे कार्यालयामार्फत प्रगतीपथावर आहे. वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर काम पुन्हा सुरू होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोर्डी (ता.चांदुरबाजार, जि.अमरावती) प्रकल्पाला सु.प्र.मा. प्रदान करण्याबाबत**

**(३६) ६२४७९ (२९-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोर्डी (ता.चांदुरबाजार, जि.अमरावती) प्रकल्पाची सु.प्र.मा. रु.३५९.०० कोटीचा प्रस्ताव शासनास २०१२ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला असून प्रकल्पाच्या सुप्रमा प्रलंबीत असून त्यास अद्यापावेतो सु.प्र.मा. प्राप्त नाही,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पास सु.प्र.मा. प्रदान करण्याबाबत व प्रकल्पाचे कालव्याऐवजी सुधारीत धोरणानुसार पाईप लाईनद्वारे सिंचन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१६) :**(१) होय.
(२) शासनाचे दि.०९ जून २०१६ चे निर्णयानुसार कालवे ऐवजी पाईप लाईनचे धोरण निश्चित झाल्यानुसार सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर सुधारित करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या ऑफलाईन अर्ज मंजूर करुन बदल्या करण्याबाबत**

**(३७) ६२६०६ (१८-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने शिक्षण विभागाला न कळविता ऑफ लाईन आलेले आपसी बदल्यांचे प्रस्ताव अपात्र ठरविल्याने येथील शिक्षक प्रचंड नाराज झाले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार आपसी बदल्यांसाठी आलेले सर्व ऑफलाईन अर्ज मंजूर करुन त्यांच्या बदल्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१), (२) व (३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यातील घोडाझरी कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३८) ६२६२१ (२३-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभीड तालुक्यातील (जि.चंद्रपूर) घोडाझरी या कालव्यावर कोट्यवधी रुपये खर्च करुनही या कालव्याची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालव्याची दुरुस्ती तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) कालव्याची दुरुस्ती आवश्यक असल्याने विशेष दुरुस्ती प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### खामदे (ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड) येथील रहिवाश्यांच्या नावावर घरकुले करण्याबाबत

**(३९) ६२७१६ (१०-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामदे (ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड) येथील हरिश्चंद्र जा.हातचांगे व इतर अनेकांनी शासकीय जमिनीवर घरे बांधुन मागील १० ते १५ वर्षापासून रहात असुन त्यांनी ही घरकुले नावावर करण्याकरिता संबंधितांकडे वारंवार लेखी मागणी करण्यात येऊनही अद्यापी त्यांच्या नांवावर घरकुले करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खामदे येथील सदरहू रहिवाशी यांच्या नांवावर घरकुले करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे

श्री.हरिश्चंद्र जा.हातचांगे, सौ.जानकी हरिश्चंद्र हातचांगे व श्री.रोहिदास हरिश्चंद्र हातचांगे रा.खामदे, ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड यांनी ग्रामपंचायत सावली यांचेकडे अर्ज केला होता.

(२) श्री.हरिश्चंद्र जा.हातचांगे, सौ.जानकी हरिश्चंद्र हातचांगे व श्री.रोहिदास हरिश्चंद्र हातचांगे, रा.खामदे, मुरुड जंजिरा, जि.रायगड यांनी मौजे खामदे येथील गट नं.१ हिस्सा नं.६ क्षेत्र ३-३५-८० हे. आर. या सरकारी, जमिनीवर अतिक्रमण करुन घरे बांधली आहेत. सदर जागा कोळी समाजासाठी मच्छी व जाळी सुकवण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे. त्यामुळे घरकुले त्यांच्या नावावर करता येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील वाघनदीवर बांधण्यात आलेल्या पुजारीटोला धरणाची देखभाल व सुशोभिकरण करण्याबाबत**

**(४०) ६२७२८ (१८-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) येथील तालुक्यातील वाघनदीवर सन १९६८ मध्ये पुजारीटोला धरणाची निर्मिती झालेली असून धरणाच्या देखरेखीसाठी दरवर्षी निधी प्राप्त होऊनही या धरणाच्या देखभाल, सुशोभिकरण व दुरुस्तीसंदर्भात मध्यप्रदेश व आपल्या राज्यातील पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने तेथील जागेचा विकास करण्याबाबतची मागणी संबंधित अधिकाऱ्यांकडे स्थानिक नागरिकांनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने पुजारीटोला धरण पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-११-२०१६) :**(१) नाही.

सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील बाघ नदीवर पुजारीटोला धरणाची दुरुस्ती संदर्भात तसेच तेथील जागेचा विकास करण्यासाठी मागणी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे अथवा पुजारीटोला धरणाशी संबंधित विभागाकडे कोणत्याही स्थानिक नागरीकांचे निवेदने प्राप्त झालेली नाही.

धरणाच्या देखरेखीसाठी दरवर्षी निधी प्राप्त होत असून यांचा वापर धरणाची व कालवे प्रणालीची देखभाल व दुरुस्ती करीता करण्यात येतो. त्यामुळे दुर्लक्ष करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मुल्यवर्धित करदात्यांची संख्या वाढविण्याबाबत**

**(४१) ६२९१२ (२९-०८-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुल्यवर्धित करदात्यांची संख्या सन २०१६-१७ मध्ये वाढविण्याबाबत वित्त विभागास उद्दिष्टय दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४, सन २०१४-१५ तसेच सन २०१५-१६ मध्ये मुल्यवर्धित करदात्यांची संख्या किती होती,

(३) असल्यास, वित्त विभागास किती मुल्यवर्धित करदात्यांची संख्या वाढविण्याचे उद्दिष्टय दिले आहे व हे उद्दिष्टय साध्य करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) करदात्यांची संख्या खालीलप्रमाणे.

सन २०१३-१४ :- ७,५९,३६४

सन २०१४-१५ :- ७,७८,९४३

सन २०१५-१६ :- ८,०८,६४५

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

---

**मौजे डोंगरशेवली (ता,चिखली, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना विद्युत जोडणी देण्याबाबत**

**(४२) ६३१०१ (१८-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील जलपूर्ती सिंचन विहीर योजना सन २०१०-११ मधील अपूर्ण राहिलेल्या विहीरी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) कडे खोदकाम व बांधकाम पुर्ण करण्यासाठी वर्ग करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे डोंगरशेवली (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांनी विहीरीचे बांधकाम व खोदकाम पुर्ण केल्यानंतरही त्यांना अद्यापपर्यंत विद्युत जोडणी दिली नसल्याचे माहे जुन, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर शेतकऱ्यांना विद्युत जोडणी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१६)** :(१) व (२) हे खरे आहे.
(३) मौजे डोंगरशेवली ता.चिखली येथे ४ शेतकऱ्यांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या विहिरीवर विद्युत जोडणी देण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण पारेषण कंपनी चिखली यांचेकडे अर्जानुसार कनेक्शनचा भरणा केलेल्या लाभार्थ्यांना जोडणीचे कार्यारंभ आदेश प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी ग्रामीण (जि.ठाणे) येथील बांधबंदिस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४३) ६३८१७ (११-०८-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी ग्रामीण (जि.ठाणे) येथील टेंभवली, गाणे, फिरींगीपाडा येथील रावजी खाडी फुटल्याने सुमारे २०० ते २५० एकर जमिन नापिक झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरातील बांधबंदिस्तीची लाखो रुपयांची दुरुस्तीची कामे कागदोपत्री दाखवून शेती संरक्षण सोसायटीच्या चेअरमनशी श्री.वाघमारे, खार जमिन विकास अधिकारी यांनी संगनमत करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी भिवंडी ग्रामीण यांनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १६ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार बांधबंदिस्तीची लाखो रुपयांची कामे कागदोपत्री दाखवून गैरव्यवहार करणाऱ्या खार जमिनी विकास अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०९-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.
गाणे फिरंगीपाडा खारभूमी योजना ता.भिवंडी, जि.ठाणे या योजनेच्या बांधास खाडी पडल्याने योजनेचे २० हेक्टर (साधारणत: ५० एकर) क्षेत्र बाधीत झालेले आहे. टेंभीवली ही खाजगी खारभूमी योजना आहे असून या योजनेचे काही क्षेत्र बाधीत झालेले आहे.
(२) आहे.
(३) श्री.मे.ग.वाघमारे, कार्यकारी अभियंता यांनी दि.२०.०४.२०१५ रोजी पदोन्नतीने खारभूमी विकास विभाग, कळवा या विभागामध्ये कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार स्विकारलेला असून त्यांनी कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून आजतागायत गाणे फिरंगीपाडा या खारभूमी योजनेवर कोणतेही काम अथवा खर्च झालेला नाही.
गाणे फिरंगीपाडा खारभूमी योजनेच्या पुन:प्रापित क्षेत्रामध्ये मौजे गाणे, फिरंगीपाडा व खारबाव या गावांच्या शिवारातील जमिनींचा समावेश आहे. तथापि, या योजनेच्या लगत टेंभीवली ही खाजगी खारभूमी योजना असून ती शासनाच्या ताब्यात नसल्यामुळे तिची देखभाल व दुरुस्ती शासनामार्फत केली जात नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तहसिल मोहाडी (जि.भंडारा) येथील पाचगाव रामपूर मार्गावरील सूर नदीवर ब्रिज कम बंधारा बांधण्याबाबत**

**(४४) ६३८५० (२९-०८-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसिल मोहाडी (जि.भंडारा) येथील पाचगाव रामपूर मार्गावरील असलेल्या सूर नदीमुळे पलीकडे जाण्यास गैरसोयीचे होत असून नदीतील पाणीही वाहून जात असल्याने स्थानिक गावांना नदीच्या पाण्याचा काहीच फायदा होत नसल्याने या ठिकाणी ब्रिज कम बंधारा बांधण्यात यावा अशी मागणी मा. जलसंपदा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली होती परंतु अद्यापपर्यंत लघु पाटबंधारे विभागाकडून कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार नदीवर ब्रिज कम बंधारा बांधण्याबाबत व बंधाराच्या कामास विलंब लावणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. सदर प्रकरणी मा.श्री.चरण वाघमारे यांचे मा.जलसंपदा मंत्री यांना दिलेले दि.२८.०१.२०१६ चे पत्र प्राप्त झाले. त्यावर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

सूर नदीवर बंधारा श्रृंखला घेण्याबाबत अभ्यास करण्यात आलेला आहे. या अभ्यासाप्रमाणे बंधाऱ्याची किंमत बरीच येऊन राज्यस्तरीय बंधारे, शासन मापदंडात सफल ठरत नाही. तथापि सूर नदीवर बंधारे घेण्याबाबत सर्वेक्षणाची कार्यवाही अधीक्षक अभियंता स्थानिक स्तर (जलसंधारण) मंडळ नागपूर कडून सुरू आहे. पुलाची मागणी लक्षात घेता पुढील आवश्यक कार्यवाही करण्यास्तव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांना मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांचे कार्यालयाचे पत्र दि. ०२.०३.२०१६ अन्वये कळविण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील संशोधन सहाय्यक (गट-ब अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४५) ६४०९६ (२३-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याच्या विभाजनानंतर पालघर जिल्ह्याची सन २०१४ मध्ये नव्याने निर्मिती होऊन महाराष्ट्र मानव विकास कार्याक्रमांतर्गत पदनिर्मिती झाल्यापासून संशोधन सहाय्यक (गट-ब अराजपत्रित) संवर्गातील चार मंजूर पदांवर अद्यापपर्यंत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील सर्व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही. नवनिर्मित पालघर जिल्ह्यात मानव विकास कार्यक्रमांतर्गत संशोधन सहायक (गट-ब अराजपत्रित) संवर्गाचे एकमेव पद व जिल्हा नियोजन समिती, पालघर येथील चार पदे अशी एकूण ५ पदे मंजूर आहेत. सदरची ५ पदे भरण्यात आलीअसून सर्व पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुख्यमंत्री फेलोशिप योजना सुरु करण्याबाबत**

**(४६) ६४२०८ (२२-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तरुणांना प्रशासनाचा अनुभव यावा विविध योजनांची माहिती व्हावी, यासाठी मुख्यमंत्री फेलोशिप योजना सुरु केल्याचे माहे जून, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेची माहिती राज्यातील पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या युवकांना देण्यासाठी शासन राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समिती, तहसिल कार्यालय, जिल्हास्तरीय व विभागीय कार्यालये येथे उक्त माहितीची सूचना फलकावर लावण्यासाठी व्यापक धोरण राबविणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेत काम करण्याकरिता दरमहा छात्रवृत्ती व प्रवास भत्ता देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना ग्रामपातळीवर तळापर्यंत राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही. मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही. उक्त योजनेचा शासन निर्णय निर्गमित झाला असून त्यामध्ये व्यापक स्वरुपात योजनेची माहिती नमूद केलेली आहे.
(३) हे खरे आहे. उक्त योजनेत काम करणाऱ्या लाभार्थ्यांस दरमहा रु. ३५०००/- छात्रवृत्ती व दरमहा रु.५००० प्रवास खर्चापोटी अनुज्ञेय आहेत.
(४) शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमांतर्गत फेलोंची नियुक्ती व निवडीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.
(५) लागू नाही.

---

**कोकणात घरबांधणी परवानगीचे अधिकार पूर्ववत ग्रामपंचायतींकडे देण्याबाबत**

**(४७) ६४५०४ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात ग्रामपंचायत क्षेत्रात घरबांधणीसाठी परवानगी देण्याचे अधिकार शासनाने ग्रामपंचायातींकडून काढून घेवून तहसीलदारांना दिल्याने कोकणातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब माहे जून २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी घरबांधणी परवानगीचे अधिकार पूर्ववत ग्रामपंचायतीना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६)** :(१) सदरील अधिकार तहसिलदारांना दिल्याचे खरे असून, याबाबत काही निवेदने प्राप्त झाली आहेत.
(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) दिनांक २९ डिसेंबर, २०१४ अन्वये करण्यात
आलेल्या सुधारणेनुसार राज्यातील प्रादेशिक योजना असलेल्या प्रदेशातील गावाच्या गावठाणाबाहेरील क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा तहसिलदार या दर्जापेक्षा
कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्याऐवजी ग्रामपंचायतींना देण्याच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायतीनी लेखापरिक्षण केले नसल्याबाबतची तपशीलवार माहिती मिळण्याबाबत**

**(४८) ६४५५२ (१८-०८-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीना १४ व्या वित्त आयोगाचे पैसे देतांना केंद्र शासनाने सन २०१४-१५ व २०१५-१६ चे लेखापरिक्षण झाल्याशिवाय पैसे द्यावयाचे नाही असा आदेश देण्यात आला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती ग्रामपंचायतीनी लेखापरिक्षण केल्याचे तसेच किती ग्रामपंचायतीनी लेखापरिक्षण केले नसल्याबाबतची तपशीलवार माहिती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-११-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

चौदाव्या केंद्रिय वित्तीय आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या जनरल बेसिक ग्रँटने अनुदान मिळण्यासाठी लेखापरीक्षणाची अट विहीत केलेली असून त्याअनुषंगाने सूचना ग्राम विकास विभागाने दि. ०१ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन परिपत्रक व दि. २८ एप्रिल, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे परफॉर्मन्स ग्रँटचे अनुदान मिळण्याकरिता संबंधित ग्रामपंचायतीचे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षंण झालेले लेखे आवश्यक असतील.

(२) यासंबंधी स्थानिक निधी लेखा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडून अहवाल घेऊन दरमहा आढावा घेण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्यातील चिखली येथे नरेगा अंतर्गत काम केलेल्या मजुरांना थकीत मजुरी देण्याबाबत**

**(४९) ६४७७६ (२९-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील चिखली येथे नरेगा अंतर्गत विविध कामांवर काम केलेल्या मजुरांचे सन २०१५- १६ व चालु वर्षातील तब्बल ६६ लाख रुपयांची मंजुरी प्रलंबित असून मजुरी न मिळाल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर मजुरांची मजुरी त्यांना तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१६)** :(१) हे खरे नाही.

चिखली तालुक्यांतर्गत सन २०१५-१६ व सन २०१६-१७ चालु वर्षातील मजूरांनी कुठलीही मजूरी प्रलंबीत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार**

**(५०) ६४९९० (०१-०९-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती कुलकर्णी यांच्या गैरकारभाराबाबतच्या अनेक तक्रारी स्थानिक नागरिकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर येथील नागरिकांच्या अनेक समस्या मांडण्यासाठी पंचायत समितीत गेले असता गटविकास अधिकारी ह्या कधीही कार्यालयात उपस्थित न राहता पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी व ठेकेदारांशी संगनमत करुन मोठया प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार गैरकारभार करणाऱ्या पंचायत समितीतील गटविकास अधिकारी, कर्मचारी व ठेकदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-११-२०१६)** :(१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे श्रमजीवी संघटनेची दिनांक २४.८.२०१६ रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे. परंतू सदर तक्रारीसोबत कोणतेही कागदपत्र जोडण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.